# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### रायगड जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहाची इमारत व पत्राशेडची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) ८९१४ (१०-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदवी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर गेली ५० वर्षापासून उभ्या असलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहाची इमारत व पत्राशेडची पुरातत्व खात्याच्या विलंबामुळे दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या महाड उपविभागाकडून किल्ले रायगडावर असणा-या विश्रामगृह, सभागृह (धर्मशाळा) कर्मचारी निवासस्थान, स्नानगृह, शौचालय व उपहारगृह याची पुनर्बांधणी अथवा दुरूस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषद रायगड यांचे मा.अधीक्षक अभियंता, रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचेकडे धर्मशाळा (विश्रामगृह) दुरुस्तीचा रु.५.०० लक्ष तसेच सभागृह दुरुस्ती रु.७.०० लक्ष इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर करणेत आला असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून इमारतीच्या पत्र्यांची दुरुस्ती तसेच फरशीकाम इत्यादि कामे अनुक्रमे माहे मार्च, एप्रिल, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**आखली आंबव सरंद (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२) २६३१८ (३०-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आखली आंबव सरंद या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहतुकीची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी होत असून त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) ते (४) प्रश्नांकित आरवली आंबव सरंद या इतर जिल्हा मार्ग क्र. ६१ दर्जाच्या रस्त्याची एकूण लांबी ४.८३० कि.मी. असून संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.

सदर रस्त्याच्या १/०० ते २/०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण गट-ब कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले आहे. उर्वरीत नादुरुस्त लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या स्तरावर विचार होवू शकेल.

---

**माण (जि.सोलापूर) नदीवर शेटफळ अहमदाबादला जोडणारा कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्याला दरवाजा न बसविल्याबाबत**

**(३) २९२७५ (१२-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा-पंढरपूर सीमेवरुन वाहणाऱ्या माण नदीवर शेटफळ अहमदाबादला जोडणारा कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्याला दरवाजा न बसविल्याने पावसाचे सर्व पाणी वाहून जात असल्याने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधारा हा लघुपाटबंधारे विभागाने बांधला असून त्याला १५ वर्षे होऊन गेली आहेत हा बंधारा त्यावेळेसच उजनी विभागाकडे हस्तांतरण करणे गरजेचे असतांनाही ते न करण्यात आल्याने या बंधाऱ्यांची पडझड झाली असूनही त्याची डागडुजी करण्यात येत नसल्याने संबंधित ग्रामस्थांनी लघुपाटबंधारे विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी जबाबदारी झटकली असल्याने तरी याबाबत शासन आवश्यक निधीची तरतूद शासन त्वरीत करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१६) :**(१) नाही.

चालू पावसाळी हंगामामध्ये दि.१५/१०/२०१५ रोजी सदर बंधाऱ्यामध्ये बर्गे बसविण्यात आले आहेत. परंतु पाऊस कमी झाल्याने पाणी साठा झाला नाही.

(२) आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असुन कामे पूर्ण झाल्यानंतर सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतर करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळाचे सावट असल्याने मुळशी धरणाचे पाणी उजनीत सोडण्याबाबत**

**(४) २९५९७ (०८-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यंदाच्या वर्षी दुष्काळाचे सावट असल्याने मुळशी धरणाचे पाणी उजनीत सोडल्यास ५ जिल्ह्यांना पाणी मिळले, यासाठी टाटा उद्योग समुहाच्या मालकीच्या मुळशी धरणातून सुरु असलेली वीजनिर्मिती प्रकल्प तात्पुरता थांबवून ते पाणी दुष्काळग्रस्त भागासाठी वळविण्यात यावे, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी किती दिवसात करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.

(२) असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील छत्री निजामपूर आदिवासी वाडी आणि वारंगी या दोन गावांना जोडणारे काळ नदीवरील साकवाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५) ३१५२४ (१६-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील छत्री निजामपूर आदिवासी वाडी आणि वारंगी या दोन गावांना जोडणारे काळ नदीवरील साकव मोडल्याने पावसाळयात विद्यार्थ्यांना वारंगी येथील माध्यमिक शाळेतील शिक्षणासाठी मानवी साखळीच्या सहाय्याने ये-जा करावे लागत असल्याचे माहे जुलै, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद्नुसार सदर काळ नदीवरील साकवाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०७-२०१६) :**(१) काळ जलविद्युत प्रकल्पांतर्गत छत्री निजामपूर व वारंगी गावास जोडणाऱ्या पूलाचे १४ पैकी ८ गाळे सन २०१३ च्या पुरामध्ये वाहून गेले ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत वारंगी गावातील ग्रामस्थ व विद्यार्थी निजामपूर ते बावळे दरम्यान अस्तित्वात असलेल्या लोखंडी पादचारी पुलाचा वापर करत आहेत.
(२), (३) व (४) सदर पादचारी पूलाची दुरुस्ती केली तरी पावसाळ्यात हा पूल पाण्याखाली जाऊन नुकसान होते. सबब कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील महाड-पोलादपूरमधील १७ गावांच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६) ३२७१२ (२२-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील महाड-पोलादपूरमधील १७ गावांचे रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त १७ गावांच्या रस्त्यांमध्ये रायगडवाडी-निजामपूर, सावरटपूल, सावरट रस्ता, करंजाडी, पिंपळकोंडी, क्रियेपदाचा कोंडा, पारमाची रामदासपठार, कोंडमालुसरे, मोरवाडी, नांदगांव काळकाई कोंडश्री ते पायरीकोंड वसाप गिजेवाडी, नेराव, सुतारवाडी या रस्त्यासह महाड-रायगड रस्ता तर पोलादपूर तालुक्यातील चरई पूल, बारावले, धामणदेवी, कोंढवी, मोरेवाडी उमरट-खोपडे लोहरपूर, तुर्भे खोंडा, पेठण, कोतवाल, पितळवाडी-केवनाळे आदी रस्ते खड्डेमय झाल्यामुळे रस्त्यावरुन एस.टी. वाहतूकीस अडथळे निर्माण होत असून मोठ्या प्रमाणात गाड्यांचेदेखील नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यांची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार उपरोक्त रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे. प्रश्नांकित रस्त्यांपैकी महाड-रायगड व पाचाड-रायगडवाडी-निजामपूर हे दोन रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून वाहतुकीस सुस्थितीत आहेत.
(३) ते (५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. रायगड जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ५७३७.४० कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ४३६०.०२ कि.मी. इतकी आहे.

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रायगड जिल्हा परिषदेस एकूण रु. १५३१.१४ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३ ते २०१४-१५ मध्ये एकूण रु.४९८.२३ लक्ष तर पुरहानी कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा परिषदेला रु. १३४०.२६ लक्ष असा एकूण रु. ३३६९.६३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. या उलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्यांची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रश्नांकित रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीची कामे टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

**डुक्करवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(७) ३३७८४ (१२-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डुक्करवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे त्याची चौकशी करणेबाबत परिसरातील विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांद्वारे दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, उपविभागीय अधिकारी, भूम, यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१६) :**(१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे प्राप्त झालेले आहे. सदरहू पाझर तलावाबाबतची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे.

डुक्करवाडी पा.त.क्र.४ ता. भूम जि.उस्मानाबाद चे काम दि.२५.४.२००३ रोजी सूरु झाले असून घळभरणीचे काम जुन, २००९ मध्ये पूर्ण झालेले आहे व तेव्हा पासून प्रतिवर्षी पाणीसाठा होत आहे. दि.२५.०८.२०१४ ते दि.२९.०८.२०१४ या कालावधीत सदर तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये

अतिवृष्टी झाली होती व त्यामुळे धरणाच्या जवळपास माथ्यापर्यंत पाणी आले होते व सांडव्यावरुन पुराचे पाण्याचा विसर्ग पुर्णपणे जात नसल्यामुळे धरण धोक्याच्या अवस्थेत होते. त्यामुळे धरणाच्या खालील बाजुच्या गावांना व शेत जमिनींना धोका होण्याचा संभव होता. त्यामुळे अंदाजे १.०० मी. ने सांडव्याची पाणी पातळी खाली करुन धरण सुरक्षित ठेवण्यात आले. दि.२६.०८.२०१४ ते ३०.०८.२०१४ या कालावधीत सतत पाऊस सुरु असल्यामुळे धरणाच्या D/S बाजुचा अंदाजे ५ मी x ५ मी x ०.६ मी भराव घसरल्यामुळे पडलेला खड्डा नंतर बुजवण्यात आला, व धरण सुस्थितीत ठेवण्यात आले. भविष्यात सदर पाझर तलावाचे व्यवस्थीत दुरुस्ती करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन दुरुस्ती कामे करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मढेवडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे घोड येथून पाणीपुरवठा करणेबाबत**

**(८) ३४४७० (२१-१२-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मढेवडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे घोड येथून पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) आंदोलनकर्त्यांची कुकडी प्रकल्पातून घोड धरणात ३ टी.एम.सी. पाणी सोडून घोड डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रास व पिण्यासाठी पाणी सोडणेबाबत मागणी होती. घोड प्रकल्पात धरणाचे पाणलोट क्षेत्रात पाऊस झाल्याने पाणीसाठा उपलब्ध झाल्यानंतर घोड डाव्या कालव्याद्वारे दिनांक ०९/११/२०१५ ते दिनांक ०५/१२/२०१५ या कालावधीत पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना थकीत अनुदान देण्याबाबत**

**(९) ३५६७१ (१४-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील विविध योजनेतील अनेक घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण केले आहे परंतु या लाभार्थ्यांना मात्र त्यांच्या

दुसऱ्या टप्प्यातील व अनेकांना त्यांची घरकुलाची कामे पूर्ण झाली असतानाही अनुदानाचे दुसऱ्या व अंतीम टप्प्यातील धनादेश मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल लाभार्थ्यांना त्यांचे थकीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दापोली तालुक्यातील ग्रामपंचायतींना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ३५७०३ (२२-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटन), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील १०६ ग्रामपंचायतीपैकी अवघ्या ४७ ग्रामपंचायतीकडे इंटरनेट सुविधा आहे व बाकी ५९ ग्रामपंचायती अद्याप ऑनलाईन सुविधेपासून वंचित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०७-२०१६) :**(१) दापोली तालुक्यातील १०६ पैकी ४८ ग्रामपंचायती मध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. उर्वरीत ५८ ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक क्षमतेची इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही.

(२) व (३) होय.

इंटरनेट सुविधा नसलेल्या ग्रामपंचायतीचे ऑनलाईन काम लगतच्या इंटरनेट सुविधा असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये अथवा पंचायत समितीमध्ये करण्यात येते.

जिल्हा परिषद रत्नागिरीकडून भारत संचार निगम लिमिटेड (बी.एस.एन.एल) कडे इंटरनेट नसलेल्या ग्रामपंचायतीना इंटरनेट व दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) अंतर्गत राज्यातील सर्वच ग्रामपंचायतीना ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे उच्च क्षमतेची इंटरनेट सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यात दापोली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीनाही सुविधा उपलब्ध होणार आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**परभणी तालुक्यातील १३ व्या वित्त आयोगातून वृक्ष लागवड रक्कमेत केलेला गैरव्यवहार**

**(११) ३८३९७ (१३-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तालुक्यातील १३ व्या वित्त आयोगातून वृक्ष लागवड करण्यासाठी तब्बल १८४९८२०/- रूपयाचे धनादेश देवून रक्कमेचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार मा.पालकमंत्री, परभणी यांच्याकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यास जबाबदार कोण,

(३) असल्यास, दोषी विरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१६) :**(१) होय, तक्रारीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार श्री.एस.एन.गोपाळ, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी व संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणी श्री.एस.एन.गोपाळ, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांचेविरुध्द विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकांना दि. १५.०१.२०१६ च्या पत्रान्वये व दि. २९.०३.२०१६ च्या अंतिम कारणे दाखवा नोटीशीव्दारे धनादेश देऊन रोपे न मिळालेल्या नर्सरीकडून रक्कम वसुली करुन ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींना रोपे न मिळालेल्या नर्सरीकडून शिल्लक असलेली रक्कम वसूल करुन संबंधित ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**भुसावळ येथील नगरपालिकांचे पाणी पुरवठ्याचे शुल्क हतनुर प्रशासनाने वारंवार नोटीस देवूनही वसूल होत नसल्याबाबत**

**(१२) ४०३३४ (०५-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ येथील हतनुर धरणातून पाच बिगर सिंचन प्रकल्प आणि चार नगरपालिकांना गेली अनेक वर्षे पाणीपुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हतनुर प्रशासनाने तब्बल १०३ कोटी ६६ लक्ष ७० हजार रुपये थकित नोटीस बजावून ही वसूल होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकित शुल्क तातडीने वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) हतनुर धरणातून तेरा बिगर सिंचन संस्था आणि आठ नगरपालिका व चोवीस ग्रामीण योजनांना पाणीपुरवठा केला जातो.
(२) होय.
(३) ज्या संस्थाचा पाणी वापर चालू आहे अशा संस्थांकडून नियमितपणे होणारी एकेरी आकारणी संस्थांकडून वसुल होते. तथापि दंडणीय आकारणी माफ करण्याबाबत सदर संस्थेची मागणी आहे. ज्या संस्था बंद आहेत त्या संस्थांकडील थकबाकीची नोंद जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर घेण्यात आली आहे व वसुलीसाठी पाठपुरावा चालू आहे.

नगरपालिकांकडील रुपये १६४.७९ लक्ष थकबाकीपैकी रुपये १५७.२३ लक्ष वसुल झालेले आहे.
(४) थकीत शुल्क वसुलीच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील सिना धरणात कुकडी धरणातील पाणी मिळण्याबाबत

**(१३) ४०५२२ (०४-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील सीना धरणात कुकडीचे पाणी मिळण्याबाबत न्यायालयाने कुकडी खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष व सचिवांना पिण्यासाठी पाणी देण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच श्रीगोंदाच्या वाटयाला ७ दिवस पाणी आले परंतु संबंधित कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाण्याचे योग्य नियोजन न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही.

कुकडी डाव्या कालव्याद्वारे रब्बी हंगाम २०१५-१६ मागील सिंचन व पिण्याचे पाण्याच्या नियोजनाकरीता दि.२६/११/२०१५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कुकडी डावा कालव्याद्वारे दिनांक ०२/१२/२०१५ ते दि.२९/१२/२०१५ या कालावधीत प्राधान्याने पिण्याच्या पाण्यासाठी व उर्वरीत पाणी सिंचनासाठी वापरण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हेटवणे (ता.पेण, जि.रायगड) धरणातील आरक्षित पाण्याबाबत**

**(१४) ४११५० (०६-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेटवणे (ता.पेण, जि.रायगड) परिसरात रुपये ८६ कोटी ३५ लाख खर्च करून पाटबंधारे विभागाने सिडकोकडून धरण बांधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाची पाणी साठवण्याची क्षमता किती दशलक्ष घनमीटर आहे व या धरणातून सिडकोला दरवर्षी किती एम एस डी पाणी आरक्षित केले जाते,

(३) सिडकोला अपेक्षित पाणी पुरवठा होऊन धरणात किती एम एस डी पाणी शिल्लक राहत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००८ मध्ये पूर्ण झाले आहे. धरण कामावर रु.३१४.२२ कोटी खर्च झाला आहे.

सिडको नवी मुंबईने धरणाचे भांडवली खर्चापोटी रु.४७.०० कोटी व सिंचन पुन:स्थापनेपोटी रु.१३९.८६ कोटी असे एकूण रु.१८६.८६ कोटी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे जमा केलेले आहेत.

(२) हेटवणे धरणाची पणी साठविण्याची क्षमता १४७.४९ दलघमी असून, उपयुक्त पाणीसाठा १४४.९८ दलघमी इतका आहे. सिडको नवी मुंबई करीता ५८.१० दलघमी (१५० एम.एल.डी.) इतक्या पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत सिडको नवी मुंबई करीता वार्षीक ३९.०० दलघमी (१०० एम.एल.डी.) इतक्या घरगुती वापरासाठी पाणी पूरवठा करण्यात येत आहे.

(३) सद्यस्थितीत सिडको नवी मुंबई करीता वार्षीक ३९.०० दलघमी (१०० एम.एल.डी.) इतक्या घरगुती वापरासाठी पाणी पूरवठा करुन धरणात बाष्पीभवन व्यय व इतर पाणी वापर वगळून सिंचनासाठी ७९.०६५ दलघमी (अंदाजित २१६ एम.एल.डी.) इतका पाणीसाठा शिल्लक रहातो.

---

**सिचंन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता न घेता कंत्राटदारांना**
**कोटयवधी निधीचा वाटप केल्याबाबत**

**(१५) ४१७१५ (०५-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील वासनी मध्यम प्रकल्पाला प्रशासनाकडुन २४३ कोटी प्रशासकीय मान्यता न घेता कंत्राटदाराला निधीचे वाटप करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आलेली आहे प्रकल्प मंजुर करताना अनियमितता झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात एकुण मंजुरी दिलेल्या प्रकल्पापैंकी ४८ प्रकल्प सुरू झोलेले नाही त्यातील ११ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील भाडा एसटी, पेढी बॅरेज प्रकल्प, वासनी मध्यम प्रकल्प, रापेरी एमआय टॅन्क, खरबी एमआय टॅन्क व इतर कंत्राटादारांना अगाऊ कोटयवधीचा निधी देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६)** :(१) नाही.

वासनी मध्यम प्रकल्पाची मंजूर सुप्रमा किंमत रु.१९७.८२ कोटी असून सदर प्रकल्प अनुशेषातील असल्याने शासनाने सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ व सन २०१५-१६ मधील तरतुदींचे मर्यादेत मंजूर सुप्रमा किंमतीपेक्षा जादा खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुषंगाने मार्च २०१६ अखेर ३६८.७५ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधिकरण यांनी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ अन्वये कलम ११ (f) नुसार १९१ प्रकल्पांना मान्यता प्रदान केली आहे. सदरहू मान्यतेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद जनहित याचिका क्र.१२४/२०१४ श्री.प्रदिप वासुदेव पुरंदरे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या याचिकेच्या दिनांक १३/०७/२०१५ रोजी दिलेल्या मा.न्यायालयाच्या आदेशामध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी राज्याचा एकात्मिक जल आराखडा तयार नसतांना दिलेल्या प्रकल्पाच्या मान्यतेबाबत आक्षेप घेतलेले आहेत.

(३) प्रधिकरणाने मान्यता दिलेल्या १८९ प्रकल्पापैकी ९ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच ३९ प्रकल्पांचे काम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही.

(४) अंशत: खरे आहे.

नमूद चार प्रकल्पापैकी वासनी व पेढी बॅरेज प्रकल्पावर कंत्राटदारांना अनुक्रमे रु.१०.०० कोटी व रु.५.५० कोटी सुसज्जता अग्रिम देण्यात आले होते. वासनी प्रकल्पाच्या सुसज्जता अग्रिमाची मुळ रक्कम व्याजासहीत पुर्णत: वसुल कर करण्यात आली आहे. पेढी बॅरेजबाबत सुसज्जता अग्रिम पैकी रु.१.०० कोटी व व्याज रु.१.८४ कोटी वसुल करण्यात आले आहे. महामंडळाकडील ३१ प्रकल्पांवर ४६ प्रकरणात एकूण रु.६४८.३८ कोटी सुसज्जता अग्रिम प्रदान करण्यात आले होते. यापैकी अग्रिम रु.६२९.०९ कोटी व रु.१४१.२० कोटी व्याज असे एकूण रु.७२०.२९ कोटी वसुल करण्यात आले आहेत.

(५) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद जनहित याचिका क्र.१२४/१४ श्री. प्रदिप वासुदेव पुरंदरे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या याचिकेच्या दिनांक १३/०७/२०१५ रोजी

दिलेल्या मा.न्यायालयाच्या आदेशानुसार श्री.रा.वा.पानसे, तत्कालिन मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता स्तरावरील समिती गठीत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना धरणातून वीजनिर्मिती केल्यानंतर वाया जाणारे पाणी मुंबईला पुरविण्याबाबत**

**(१६) ४१८३२ (०३-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातून वीजनिर्मिती केल्यानंतर वाया जाणारे पाणी मुंबईला पुरविण्यासाठी कोयना ते मुंबई नदीजोड प्रकल्पाचा अहवाल तयार करणे व सदरची योजना राष्ट्रीय योजना घोषित करण्यासंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच मुंबईतील पाणी टंचाई दुर करण्यासाठी सदरचा प्रकल्प पुर्ण करण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांनी अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) कोयना अवजलाचे ६७.५ टी.एम.सी. पाणी मुंबईला आणण्यासाठी राष्ट्रीय विकास अभिकरणाने तयार केलेल्या पुर्व व्यवहार्यता अहवालावर महाराष्ट्र राज्याचे वस्तुस्थितीदर्शक अभिप्राय राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविण्यात आले असून, सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती दि.२६.१०.२०१५ चे पत्रान्वये अभिकरणास करणेत आली आहे.
(३) योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत प्रगतीपथावर असून त्यास आवश्यक त्या सर्व मंजूऱ्या घेतलेनंतर प्रकल्पाचे काम करता येणार असल्याने सद्या प्रकल्पाच्या पुर्णत्वाचा कालावधी निश्चित सांगता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील कुंडलवाडी-शेळगाव-चन्नापूर व पाटोदा माहटी (ता.बिलोली) ही उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्याबाबत**

**(१७) ४३९६१ (३०-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील कुंडलवाडी-शेळगाव-चन्नापूर व पाटोदा माहटी (ता.बिलोली) ही उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे. विषयांकित मागणीबाबत दि.१३.१०.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(२) सदर योजना जलसंपदा विभागाच्या नाहीत. तसेच या योजना कुंडलवाडी विविध सहकारी संस्था व शंकर सहकारी कारखाना यांना संयुक्तपणे अंशतः पुर्ण केलेल्या असल्याने, योजनांची उर्वरित कामे सुध्दा त्यांचे मार्फतच पुर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अकोला जिल्हयात काम करणाऱ्या मजुरांना वेळत मजुरी देण्याबाबत**

**(१८) ४४७५६ (३०-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकोला जिल्हयात काम करणाऱ्या मजुरांना वेळेवर मजुरी प्रदान करण्याचे प्रमाण केवळ १८.१९ टक्के असून ८१.८१ टक्के मजुरी उशिराने मजुरांना प्रदान केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमी योजनेंतर्गत कामाचे सात दिवसांत मस्टर तयार करुन २१ दिवसांत कामांवरील मजुरांना मजुरीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला जिल्हयात मजुरांची मजुरी उशिरा देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन मजुरी उशिरा प्रदान करणाऱ्यांविरुध्द शासनाने काय कारवाई केली तसेच मजुरांना वेळेवर मजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांची मजुरी हजेरीपत्रक बंद झाल्यापासून १५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे.

(३) ग्राम सेवक, तांत्रिक अधिकारी, डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर, सहा लेखाधिकारी/अका रोहयो या प्रत्येक स्तरावरुन मस्टर उशिरा पुढील स्तरावर प्राप्त झाल्यामुळे तसेच इंटरनेट सुविधेतील बिघाट/खंड, DSC धारक अधिकारी/कर्मचारी यांचे बदली तसेच DSC तसेच धारक अधिकारी/कर्मचारी यांचे बदली DSC EXPIRE या सर्व बाबींमुळे मजुरांना मजुरी प्रदान करण्यास उशिर झालेला आहे.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे प्रदान १५ दिवसांच्या आत करण्यात आले नाही तर मजुरीच्या प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी १६ व्या दिवसापासून प्रतिदिवस देय मजूरीवर ०.०५% नुकसानभरपाई देण्यासंदर्भात दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर कार्यपध्दती नविन असल्याने दि.३० जून, २०१५ पर्यंत विलंब नुकसान भरपाईच्या रकमेचा भार राज्य शासनामार्फत सोसण्यात आला आहे. विलंब नुकसान भरपाईची रक्कम दि.१ जुलै, २०१५ पासून विलंबास जबाबदार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसुल करण्यात येत आहे.

अकोल जिल्हयात दि.१.७.२०१५ ते दि.३१.३.२०१६ पर्यंत विलंबास जबाबदार असणाऱ्यांकडून एकूण रु.४१,४३८/- एवढी विलंब नुकसान भरपाईची रक्कम योजनेच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. तसेच मजुरांना मजुरीचे प्रदान वेळेवर होण्याकरीता सर्व तालुका व पंचायत समिती स्तरावर मस्टर ट्रकर नोंद ठेवण्याबाबत निर्देशीत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विलंबाबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला, गट विकास अधिकारी, मुर्तिजापूर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणे कापूस, तूर, धान, सोयाबीन या पिकांच्या उत्पादनावर होणारा खर्च म.ग्रा.रो.हमी योजनेंतर्गत करण्याबाबत**

**(१९) ४५०२४ (३०-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणे कापूस, तूर, धान, सोयाबीन इ. या पिकांच्या उत्पादनावर होणारा खर्च हा महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याबाबत लोकप्रतिनिधीं, अचलपूर यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणे कापूस, तूर, धान, सोयाबीन या पिकांच्या उत्पादनावर होणारा खर्च म.ग्रा.रो.ह.मी. योजनेंतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०७-२०१६) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ (दि.६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसुची २ मधील परिच्छेद ३ (३) मध्ये गवत कापणे, शेतीची कामे या सारखी अमूर्त स्वरुपाची कामे, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्भवणारी कामे घेता येणार नाहीत. अशी तरतूद आहे. त्यानुसार प्रत्यक्ष शेतीची कामे उदा.पेरणी ते कापणी ही केंद्र शासनाच्या तत्वानुसार नरेगा अंतर्गत घेणे अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इच्छागव्हाण (ता.तळोदा, जि.नंदुरबार) धरणाला मान्यता मिळण्याबाबत**

**(२०) ४६७०५ (०४-०५-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोदा (जि.नंदुरबार) तालुक्यातील इच्छागव्हाण लघुपाट बंधा-याला (धरणाची) शासनाची मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष काम केव्हा सुरु होणार आहे,

(३) असल्यास, धरणाचे काम सुरु होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०७-२०१६) :**(१) होय.

(२) इच्छागव्हाण धरणाच्या बुडीतात येणारे २६.७७ हे. क्षेत्राच्या वनजमिन संपादनाच्या प्रस्तावास वनखात्याची अंतिम मान्यता मिळाल्यावर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

(३) वन जमिन संपादनाचा प्रस्ताव अतिरिक्त प्रधान वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी शेरेपुर्तता करुन फेरसादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी (जि.भंडारा) येथे स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत कायम स्वरुपी विक्री केंद्राचे बांधकाम करण्याबाबत**

**(२१) ४७५८० (२९-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) येथे स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत कायम स्वरुपी विक्री केंद्राचे बांधकाम सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाने या प्रकरणी जागा उपलब्ध करुन देण्यात आल्याची खोटी माहिती पुरविली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) उप वनसंरक्षक, भंडारा यांचे आदेश क्रमांक ६३२/२/१५-१६ दिनांक ०१.०४.२०१६ अन्वये जागेचे क्षेत्र वळती करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेत निधी विनावापर पडून असल्याबाबत**

**(२२) ४७७१० (२९-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेने दोन वर्षापासून एकही योजना राबविली नसून निधीही खर्च करण्यात आलेला नसल्याने मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्यांचा लाभ घेता आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी देण्यात आलेला निधी खर्च न केल्यामुळे सदर निधी शासनाकडे परत पाठविणार आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
अकोला जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन विभाग व शिक्षण विभाग यांनी विविध योजनांवर खर्च केला आहे.
(२) हे खरे नाही.
वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -१०.०२/प्र.क्र.१२८/ अर्थोपाय, दि.०६ जून, २००८ नुसार खर्च न झालेला निधी पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्याची परवानगी आहे. त्यानुसार अकोला जिल्हा परिषदेकडील निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षात विविध योजनांवर खर्च करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्हा परिषदेला विकास कामासाठी मिळालेल्या निधीचे समायोजन न केल्यामुळे निधी शासनाकडे परत गेल्याबाबत

**(२३) ४८५५५ (२८-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेला सन २०११ ते २०१३-१४ या कालावधीत शासनाकडून आलेल्या रकमेपैकी विकास कामावरील ७.५६ कोटी रुपये व अधिकारी, कर्मचारी यांच्या वेतनावरील १३.९८ रुपयाचे समायोजन न झाल्याचे शासनाकडे परत गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परत गेलेल्या निधीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) होय.

राबविण्यात आलेल्या योजनेतील काही रक्कम शिल्लक राहणे, योजनांचे प्रस्ताव कमी प्राप्त होणे, केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त न होणे, अंगणवाडी बांधकामामुळे अनुदान प्राप्त न होणे, अंगणवाडी बांधकामामुळे भाडेपट्टीवरील अंगणवाडी संख्या कमी होणे, मंजूर आस्थापनेनुसार वेतनावर खर्च करण्यात आल्याने वेतन या मुख्य बाबीवर बचत होणे इत्यादी बाबींमुळे निधी अखर्चित राहिला आहे.

ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.अखनि-२०१६/प्र.क्र.२३/वित्त-२ दि.१३ मे, २०१६ याप्रमाणे अखर्चित निधी तात्काळ भरणा करणेबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### प्रवरा, गोदावरी खो-याच्या प्रस्तावित जल आराखड्यानुसार मराठवाड्याला पाणी जाणार असल्याने अहमदनगर जिल्ह्यामध्ये पाणी कपात होणार असल्याबाबत

**(२४) ४९७७४ (३०-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा, गोदावरी खो-याच्या प्रस्तावित जल आराखड्यास विरोध करण्यासाठी तसेच त्यात दुरुस्ती करण्यासंदर्भात पाणी बचाव समितीच्यावतीने बैठका आयोजीत करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित आराखड्यानुसार मराठवाड्याला पाणी जाणार असल्याने अहमदनगर जिल्ह्यावर पाणी वाटपामध्ये कपात होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :**(१) दिनांक २५/११/२०१५ चे अहमदनगर जिल्हा पाणी बचाव समितीचे विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार राहता, जि.अहमदनगर यांना प्राप्त झाले आहे.
(२) प्रस्तावित प्रवारा उपखोऱ्याच्या आराखडयात अद्याप जिल्हावार पाणी वाटप करण्यात आलेले नाही. प्रवारा उपखोऱ्यात किती पाणी उपलब्ध आहे व २०३० साली शेतीसाठी, पिण्यासाठी व उद्योगासाठी किती पाणी लागणार आहे. याचा तपशिल निश्चित करण्यात आलेला नाही. अद्याप आराखडयास मंजुरी मिळालेली नाही.
(३) गोदावरी खोऱ्याचा जल आराखडा अंतिम करण्याचे दृष्टीने शासनाने दिनांक १२/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये तज्ञ समीतीचे गठीण केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी वाणगांवच्या पश्चिम दिशेस पाईपलाईनद्वारे सोडण्याबाबत**

**(२५) ५००७४ (०५-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी वाणगांवच्या पश्चिमेस रेल्वेक्रॉसिंग करुन पाईपलाईनद्वारे नेऊन तेथील ओढे व नाल्यांमध्ये सोडण्याचा प्रकल्प सन २००६ रोजी हाती घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षात ९० टक्के काम पूर्ण होऊनही पाणी रेल्वे क्रॉसिंग करुन पश्चिमेला नेण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे पश्चिमेकडील प्रगत शेतक-यांना शेतीच्या पाण्याला मुकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, वाणगांव पश्चिम भागाला उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्यामुळे सदर प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.

सद्यस्थितीत या भागातील काम ९०% पुर्ण झाले आहे. रेल्वे विभागाकडून रेल्वे ओलांडण्यास मान्यता घेण्याची व रेल्वेबरोबर करारनामा करण्याची कार्यवाही दिनांक १६/४/२०१५ रोजी पूर्ण करण्यात आली आहे. रेल्वे क्रॉसिंग तसेच तारापूर अणूशक्ती केंद्राच्या जलवाहिन्या क्रॉसिंग यांच्या कामाची ही अंदाजपत्रके अद्यावत करुन सक्षमस्तरावरुन मान्यता घेणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील नुतनीकरणाच्या कामाकरिता लागणारा खर्च जिल्हा निधीतून केल्याने जिल्हा परिषद सदस्यांना विकास कामासाठी निधी अपूरा पडत असल्याबाबत

**(२६) ५०१८१ (३०-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील तळ मजला व पहिल्या मजल्याचे नुतनीकरणाच्या कामाकरिता तब्बल १ कोटी १५ लाखांचा खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा खर्च हा जिल्हा निधीतून केल्याने जिल्हा परिषद सदस्यांना विकास कामासाठी निधी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील तळ मजला व पहिल्या मजल्याच्या नूतनीकरणाच्या कामाकरीता रु. २६.५३ लक्ष खर्च करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर जिल्हा परिषदेची इमारत १९६६ ची जुनी असून तीची दुरुस्ती तसेच विद्युतीकरण वायरिंगची दुरुस्ती करणे आवश्यक होते त्यासाठी १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा निधीतून सदर खर्च करण्यात आलेला नसून विकास कामांसाठी असलेल्या निधीवर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीस जलविकास अभिकरणाने प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत**

**(२७) ५०२५१ (०३-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराची लोकसंख्या सध्याच्या जणगणनेनुसार ४५ लाखावर पोहोचणार असून शहराची पाण्याची गरज भागविण्यासाठी दररोज ३४ दशलक्ष घनफूट पाणी लागेल म्हणजेच महानगरपालिकेला एका वर्षात १२.४१० दशलक्ष घनफूट पाणी राखून ठेवणे आवश्यक ठरले त्यामुळे ही पाण्याची गरज भागविण्यासाठी दमनगंगा गोदावरी लिंक योजना राबविणे गरजेचे असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये या योजनेस तत्वत: मंजूरी देऊन सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल करण्याचे पत्र राष्ट्रीय जलविकास अभिकरणास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीस जलविकास अभिकरणाने प्रकल्प अहवाल तयार करावा यासाठी शासनाने कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

दमनगंगा (एकदरे) - गोदावरी खोरे या राज्यांतर्गत नदी योजनेचा पूर्व संभाव्यता अहवाल (PFR) दिनांक २५/०३/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे.

पुर्वसंभाव्यता अहवालानुसार वळविण्यात येणाऱ्या १४३ द.ल.घ.मी. पाण्यापैकी ७० टक्के पाणी १५६०० हेक्टर सिंचनाकरिता वापरण्यात येणार असून उर्वरित ४३ द.ल.घ.मी. हे घरगुती वापराकरिता तसेच औद्योगिक वापराकरिता प्रस्तावित आहे.

पुर्वसंभाव्यता अहवालानुसार सदर योजनेची किंमत (वर्ष २००८-०९) रु.४५९ कोटी इतकी असून प्रकल्पाचे लाभव्यव गुणोत्तर १.४४ इतके आहे. तसेच सदरहू योजनेचा परतावा (Internal rate of return) हा १६.७८% इतका आहे. यामुळे सदरहू योजना व्यवहार्य आहे.

दमणगंगा (एकदरे) - गोदावरी खोरे या राज्यांतर्गत नदी जोड योजनेचा सविस्तर संभाव्यता अहवाल (DPR) करणेबाबत मुख्य अभियंता, राष्ट्रीय जलविकास अभिकरण, हैद्राबाद यांना दिनांक १२/०३/२०१५ कळविण्यात आले आहे.

(२) होय.

दिनांक १२/०३/२०१५ च्या पत्राने कळविले आहे.

(३) याबाबत मा.केंद्रिय जलसंधारण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या नदीजोड प्रकल्पांचे विशेष समितीच्या बैठकीत वेळोवेळी शासनाने मागणीबाबत पाठपुरावा केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे भीमा व माण कॅनॉलला पाणीची पाळी सोडण्याबाबत**

**(२८) ५०३९७ (२९-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील येथे पर्जन्यमान कमी झाल्याने तब्बल ६० टक्के ऊस क्षेत्रात घट झाली असून त्यातच भीमा व माण नदीबरोबर कॅनॉललाही पाणी पाळी न मिळाल्याने ऊस होरुपळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील अनेक महिन्यांपासून नदीला पाणी नसल्याने ऊस जळून जात आहे या कारणास्तव शेतीसाठी बँकेकडून काढलेले कर्ज फेडणेही अशक्य झाले आहे तरी भीमा व माण कॅनालला पाणीची पाळी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) अशंत: खरे आहे.
सन २०१५ मध्ये सोलापूर जिल्हयात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे तसेच उजनी जलाशयात पाणीसाठा न झाल्याने पाण्याअभावी ऊस वाढीवर व उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून आले आहे.
(२) ऑक्टोबर, २०१५ अखेर पर्यत उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा झाला नसल्याने सिंचनासाठी पाणी सोडण्यात आलेले नाही. सदर बाब ही नैसर्गिक आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी मंजूर करूनही**
**शासनाने संपूर्ण निधी वितरीत न केल्याबाबत**

**(२९) ५०५१७ (०५-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मराठवाडा विकास मंडळास १०० कोटी रुपयाचा निधी स.न.२०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केला असून फक्त १३ कोटी रुपयेच निधी मंडळास प्राप्त झाल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदरचा उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१६) :**(१), (२) व (३) सन २०१४-१५ या वर्षात तीन्ही मंडळाच्या शिफारशीनुसर हाती घ्यावयाच्या कामांसाठी प्रत्येकी रु.१०० कोटी इतका विशेष निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली होती. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात

मराठवाडा विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यात जानेवारी, २०१५ अखेर केवळ रु.४.११ कोटी इतक्या रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असल्याने, मराठवाडा विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांना उपलब्धतेनुसार रु.१३.९९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ५०५४७ (०५-०५-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील रस्ते करण्यासाठी केंद्र सरकारमार्फत राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजना सन २०००-२००१ या आर्थिक वर्षापासून राबविली जात असून या योजनेंतर्गत मराठवाडयातील पहिल्या टप्प्यातील ६१ आणि दुसऱ्या टप्प्यातील १२४ कामांसाठी निधी उपलब्ध होत नसल्यामुळे ही कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) मराठवाडयातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेसाठी ४३० कोटीच्या निधीची आवश्यकता आहे तथापी केंद्र सरकारकडे वारंवार पाठपुरावा करूनही निधी मिळत नसल्यामुळे ही कामे मार्गी लावण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) मराठवाडयातील आठ ही जिल्हयात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १४२ कामे हाती घेण्यात आली त्यामध्ये २९० कामे पूलाची तर १३५२ कामे रस्त्यांची आहेत त्यापैकी १५८१ कामे पूर्ण झाली असून ६१ कामे निधी अभावी प्रलंबित असल्याने तेथील ग्रामीण जनतेची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाडयातील आठही जिल्हयात प्रलंबित असलेली ६१ कामे शीघ्रगतीने हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१६) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मराठवाडा विभागामध्ये प्रमंग्रासयो-१ अंतर्गत एकुण ३९ कामे व प्रमंग्रासयो-२ अंतर्गत १०२ कामे प्रलंबित आहेत.

उपरोक्त प्रलंबित कामांसाठी एकुण रु.३५४.२२ कोटीची निधीची आवश्यकता आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत राज्यास मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात पुरेसा निधी केंद्रशासनाकडून उपलब्ध न झाल्याने योजनेतील कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे.

मराठवाड्यातील आठ जिल्हयात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-१ अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या एकुण १६४२ कामांपैकी १३४७ रस्त्यांची व २५६ पुलांची अशी एकूण १६०३ कामे पुर्ण झालेली आहेत.

तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-२ अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या एकुण १३७ कामांपैकी एकूण ३५ कामे पुर्ण झालेली आहेत. उर्वरीत कामे सुरु आहेत.

(४) व (५) राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्यशासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेस सन २०१५-१६ मध्ये रु.५५३.३० कोटी निधी वितरीत केलेला असून राज्यानेही राज्य हिश्श्यापोटी रु.१७६.०० कोटी निधी वितरीत केला आहे. एकूण वितरीत निधीपैकी मराठवाड्याकरिता रु.१३०.१४ कोटी इतका निधी सन २०१५-१६ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

---

**मराठवाड्याला देण्यात आलेला निधी अपूरा असल्याबाबत**

**(३१) ५०७१४ (३०-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुर्णत्वास आलेल्या प्रकल्पांवर अतिरिक्त निधी खर्च करण्याचा निर्णय घेतला असुन त्या अंतर्गत पाचही महामंडळातल्या ३३ प्रमुख सिंचन प्रकल्पांना ३८९ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास मंजुरी देतांना शासनाने विदर्भाला २६९ कोटी रुपयांचा तसेच दुष्काळग्रस्त गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळातल्या दोन प्रकल्पांच्या कामांना केवळ ६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३८९ कोटीपैकी विदर्भ महामंडळाला २६९ कोटी तर मराठवाड्याला केवळ ६१ कोटी देण्यात आले असुन मराठवाड्याला देण्यात आलेला निधी अत्यंत अत्यल्प असुन यातुन केवळ भूसंपादन यांत्रिकी विभागाची देणी देण्यात आली आहेत तरी मराठवाड्याला निधी वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) दिनांक ६.११.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील ३३ प्रकल्पांवर सन २०१४-२०१५ या वर्षातील अखर्चित तरतुदीच्या मर्यादेत तसेच सन २०१५-२१०६ च्या वितरीत केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत मंजूर प्रशासकीय मान्यता/सुधारित प्रशासकीय मान्यता पेक्षा वाढीव खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. त्यात विदर्भातील २४ प्रकल्पांवर रु.२६९.६४५५ कोटी आणि गोदावरी मराठवाड्यातील २ प्रकल्पांवर रु.६१.३८९२ कोटी निधीचा समावेश आहे.

(२) ही मान्यता दिलेला निधी अतिरिक्त नसुन मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार प्राप्त निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांच्या निदेशानुसार प्रकल्पांना निधी उपलब्ध करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तापी पाटबंधारे महामंडळाच्या माध्यमातून प्रस्तावित केलेल्या विविध सिंचन योजनेस निधी मिळण्याबाबत**

**(३२) ५०७४२ (३०-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील सिंचन क्षमतेत वाढ व्हावी, अवर्षण प्रवण क्षेत्रातील टंचाई दूर व्हावी म्हणून तापी पाटबंधारे महामंडळाच्या माध्यमातून विविध सिंचन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी योजना लांबल्या असून ५६६८ कोटींच्या योजनांची किंमत आता ८८६८ कोटीवर गेली आहे तसेच काही निधी प्राप्त झालेला आहे परंतु ५९२७ कोटीचा उर्वरित निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजना पुर्ण करण्यासाठी उर्वरित निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०८-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

तथापि या महामंडळांतर्गत जळगांव जिल्ह्यातील प्रकल्पांची अद्ययावत प्रशासकीय मान्यता किंमत रुपये ५६५७.१२७ कोटी इतकी असून अद्ययावत प्रस्तावित किंमत रुपये ८९७२.७३६ कोटी एवढी आहे. माहे मार्च २१०६ अखेर उर्वरीत किंमत रु.५९१९.००८ कोटी एवढी आहे. सन २०१६-२०१७ करीता रुपये ४७६.३८१० कोटी एवढी तरतूद आहे.

(३) मा.राज्यपाल यांच्या निर्देशानुसार महामंडळाअंतर्गतच्या प्रकल्पांना निधीची तरतूद करण्यात येते त्यानुसार सन २०१६-२१०७ करीता रुपये ४७६.३८१० कोटी एवढी तरतुद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

---

**अहमदपुर नगरपालिका क्षेत्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे सुरु करुन मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३३) ५०८०२ (३०-०४-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपुर नगरपालिका क्षेत्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे सुरु करुन मजुरांना काम उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी गेल्या १ वर्षापासून जिल्हाधिकाऱ्यांकडे केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करुन सुध्दा अद्यापपर्यंत येथील मजुरांची नोंदणी झाली नाही, कामाचे अंदाजपत्रक केले नाही व कामाला प्रशासकीय मजुरी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्याची मागणी करुन सुध्दा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत काम सुरु न करणाऱ्या अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) मुख्याधिकारी नगरपरिषद, अहमदपूर यांचेकडून मजुर नोंदणीची कामे व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु करण्यात आलेले होते. तथापि, अहमदपूर नगरपरिषद ही दिनांक १/१/२०१६ पासून "ब" वर्ग नगर परिषद म्हणून रुपांतरीत झाल्याने मग्रारोहयोची कामे घेता येत नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील आर्थिक दृष्ट्या डबघाईत असलेली सात महामंडळे बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(३४) ५०८८८ (०३-०५-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिक दृष्टया डबघाईत असलेली मॅफ्को, मेल्ट्रॉन, कोकण विकास महामंडळ, विदर्भ विकास महामंडळ, मराठवाडा विकास महामंडळ, भू विकास महामंडळ, महाराष्ट्र वस्त्रोद्योग विकास महामंडळ इत्यादी समाजाच्या विविध स्तंरातील घटकांचा विकास व्हावा, तसेच प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने स्थापन केलेली महामंडळे बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संबंधीची प्रक्रिया वित्तीय आर्थिक सुधारणा विभागामार्फत सुरु झाल्याचे व महामंडळातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना अन्य विभागांत सामावून घेण्यात येईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळे स्थापना मागील उद्देशाचा फेरविचार केला जाणार आहे काय व आणखी ही काही महामंडळे बंद करण्याचा विचार शासनपातळीवर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मॅफ्को आणि मेल्ट्रॉनच्या मुंबईतील अनेक ठिकाणच्या जागा, मालमत्ता शासन ताब्यात घेऊन खाजगी व्यक्ती/कंपन्यांना विकणार अथवा शासकीय आस्थापनांना वर्ग करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१६) :**(१) सदर महामंडळे बंद करण्याचा निर्णय शासनाने सन २००१ ते २००५ या कालावधीमध्ये वेळोवेळी घेतला आहे.
(२) या ७ ही महामंडळातील सर्वे अधिकारी/कर्मचारी यांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात आली आहे.

(३) याबाबत दिनांक ३०/०१/२००६ च्या शासन निर्णय अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या उच्चाधिकार समितीच्या निदेशानुसार सध्या तोट्यात चालत असणाऱ्या महामंडळाचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे.
(४) सदर महामंडळाची मालमत्ता विक्री करण्यासाठी दिनांक ३०/०१/२००६ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या निदेशानुसार/शिफारशीनुसार या महामंडळाची मालमत्ता विक्री/शासनाला हस्तांतरीत करण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात आली आहे/येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहीरींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(३५) ५०९३७ (३०-०४-२०१६). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात दिनांक ३१ मे, २०१५ पूर्वी एकूण ५१० सिंचन विहीरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली होती व त्यापैकी १५० सिंचन विहीरींची कामे प्रत्यक्ष सुरु झाली असुन ३६० सिंचन विहीरीची कामे सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन परिपत्रक क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१ दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजीनुसार दिनांक २३ मे, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सुरु असलेल्या दुरुस्तीची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे असे नमुद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहीरींची व प्रशासकीय मान्यता प्राप्त परंतु प्रत्यक्ष कामे सुरु न झालेल्या विहीरींच्या दुरुस्तींची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) शासनाने पत्र क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ अन्वये, प्रशासकीय मान्यता प्राप्त परंतु प्रत्यक्ष कामे सुरु न झालेल्या ३६० विहिरी दिनांक ३१ मे, २०१७ पर्यंत, पूर्ण करणेबाबत विशेष बाब म्हणून अनुमती देण्यात आलेली असून विहिरींचे कामे सुरु झालेली आहेत. सद्यस्थितीत एकूण ५१० विहिरींपैकी २४९ विहिरींची कामे सुरु होऊन ८७ विहिरीची कामे पूर्ण झालेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील जिहे कठापूर पाणी पुरवठा योजनेला निधी देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३६) ५०९६६ (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील जिहे कठापूर पाणी पुरवठा योजनेला रुपये २५१ कोटी देण्याचा प्रस्ताव शासनाने मा.राज्यपालांकडे पाठविला असून लवकरच हा निधी देण्याची ग्वाही मा.राज्यपालांनी दिली असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला निधी देण्यास मंजूरी द्यावी यासाठी शासनाने मा.राज्यपाल यांच्याकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) व (२)

जिहे कठापूर उपसा सिंचन योजना अंशत: कार्यान्वित करुन माण खटाव तालुक्यात ११८५० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी आवश्यक रु.२५१ कोटी निदेशाच्या बाहेर ठेवण्यास मान्यता द्यावी असा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन मा.राज्यपालांना मे, २०१५ मध्ये सादर करण्यात आला होता. मा.राज्यपालांनी प्रकल्पासाठीचे प्राथम्य ठरवून या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा असे कळविले आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये प्रकल्पासाठी रु.३० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देहर्जे मध्यम प्रकल्प (ता.विक्रमगड, जि.पालघर) या सिंचन प्रकल्पाला निधी मिळण्याबाबत**

**(३७) ५१०६० (०३-०५-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहर्जे मध्यम प्रकल्प, (ता.विक्रमगड, जि.पालघर) या सिंचन प्रकल्पास सन १९७९ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचनासाठीचा प्रकल्प आदिवासी क्षेत्रात असल्याने शासनाचे या सिंचन प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रकल्पांर्गत येणाऱ्या गावांचे सर्व्हेक्षण करणे, प्रकल्प कार्यालय उभारणे, गावांचे पुनर्वसन यासाठी काय उपाययोजना केल्या असून यासाठी आतापर्यंत किती निधी खर्च केला आहे व पुढील कार्यासाठी किती निधी ठेवण्यात आला आहे तसेच हा प्रकल्प किती कालावधीत पुर्ण होणार आहे,

(४) असल्यास, प्रकल्पाच्या दिरंगाईस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता सन १९७९ मध्ये प्राप्त झाली होती. तथापि सदरची मान्यता ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवूनही आर्थिक तरतूद नसल्याने ती व्यपगत झाली.

तद्नंतर महामंडळाचा निर्णय दि. २१/१०/२००५ अन्वये प्रकल्पास पुन:प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली.

सदरचा प्रकल्प पूर्वी सिचंन प्रकल्प प्रस्तावित होता. तथापि शासन निर्णय दि. ०४/०३/२०१४ नुसार हा प्रकल्प वसई विरार शहर महानगर पालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी, वसई-विरार महापालिकेच्या आर्थिक स्त्रोतातून राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रकल्पाच्या बूडीत क्षेत्रातील वनक्षेत्र हस्तांतराची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील खाजगी जमीन ताब्यात घेण्याबाबतची भू-संपादन प्रक्रिया प्रगतीत आहे.

देहरजी प्रकल्पावर माहे १/२०१६ अखेर रु. १७७.९९ कोटी (वन प्रस्ताव NPV व इतर किरकोळ बाबीवर) खर्च झालेला आहे.

प्रकल्प वसई-विरार महानगरपालिकेचे खर्चाने कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या निधीनुसार प्रकल्प काम करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भगतपाडा-विहीरीचा पाडा, मळेगांव-शिरगांव, चेरवली-आपटे, विहीगांव-माळ या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ५१३६५ (२९-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भगतपाडा-विहीरीचा पाडा, मळेगांव-शिरगांव, चेरवली-आपटे, विहीगांव-माळ या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील कामांना मंजूरी व अनुदान तीन वर्षापूर्वी मिळूनही सदर कामे अद्याप अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील मळेगांव-शिरगांव, चेरवली-आपटे, विहिगांव-माळ ही कामे पूर्ण झाली असून भगतपाडा-विहीरीचा पाडा व चेरवली-आपटे ही रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) ते (४) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात कमी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्या कामावर परिणाम झाला आहे.

तसेच प्रश्नांकित कामांपैकी भगतपाडा-विहीरीचापाडा या कामास कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे विलंब झाल्यामुळे कंत्राटदारास त्या विलंबासाठी दंड आकारण्यात आला आहे.

---

**मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणा-या मुळा नदीवरील पूलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) ५१४०६ (२७-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्याने कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूल पाण्याखाली जावून सदर पुलावरुन होणारी वाहतुक माहे जून, २०१६ पासून बंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर पुल दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

सदर पुलावरुन २८.०१.२०१६ पासून पूर्ववत वाहतूक सुरळीत चालु झालेली आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर पुल पाण्याखाली जात असल्याने दुरूस्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सदर प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासन स्तरावर छाननीत आहे. सुप्रमा मान्यतेनंतर नवीन पुलाचे काम हाती घेण्यात येईल.

---

**राज्य मंत्रीमंडळाच्या पुनर्रचित पायाभूत सुविधा समितीने राज्यातील आठ (८) पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजूरी देण्याबाबत**

**(४०) ५१४५५ (०६-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंत्रीमंडळाच्या पुनर्रचित पायाभूत सुविधा समितीने दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील ५२ हजार कोटी रुपयांच्या आठ (८) पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकल्प कोणकोणते आहेत तसेच किती कालावधीत पूर्ण करण्याचे व प्रकल्पांना लागणाऱ्या निधीचे नियोजन करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी खोऱ्याच्या आराखड्यावर मराठवाडा विकास प्रतिष्ठानने घेतलेल्या आक्षेपाबाबत**

**(४१) ५१५०४ (०३-०५-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे गोदावरी खोऱ्याचा आराखडा तयार करुन नुकताच जनतेच्या अभिप्राय आणि आक्षेपासाठी उपलब्ध करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील विशेषत: मराठवाड्यातील पाणी टंचाई निवारण्याचा दृष्टीकोन आराखड्यात नसल्याने या आराखड्यासंदर्भात मराठवाडा विकास प्रतिष्ठानने आपले आक्षेप आणि अभिप्राय महामंडळास सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आक्षेप व अभिप्रायाचे स्वरुप काय आहे व त्याबाबत पुढे कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) मराठवाडा विकास प्रतिष्ठान यांनी सूचना व आक्षेपद्वारे जल आराखड्याबाबतच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. तसेच काही त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत.

या संदर्भात दिनांक १९/११/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य जल परिषदेच्या दुसऱ्या बैठकीत सदरहू गोदावरी खोऱ्याच्या जल आराखड्यामध्ये विविध Stake-holders यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन परिपुर्ण जल आराखडा तयार करावा. या कामाकरिता अधिकाऱ्यांची एक कृती गट (Dedicated team) तयार करण्यात यावी. या Team ला मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत तसेच निवृत्त अधिकारी व खाजगी क्षेत्रातील तज्ञांच्या गटाची नियुक्ती करावी. सदरहू सुधारणासह अद्यावत जल आराखड्यास तीन महिन्याच्या कालावधीमध्ये राज्य जल परिषदेची मान्यता घ्यावी. असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १२/०४/२०१६ नुसार गोदावरी खोरे-एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याचे दृष्टीने तज्ञ समिती स्थापना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेळगाव (जि.जळगाव) बॅरेज प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(४२) ५१८४१ (०५-०५-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील महत्वपूर्ण अशा शेळगाव बॅरेज प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता प्रलंबित असल्याने प्रकल्पाचे कामकाज पुर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) शेळगाव प्रकल्पाचे कामकाज पूर्ण होण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

वित्त विभागाच्या शेऱ्याची पुर्तता प्रगतीत आहे.

(३) वरील प्रमाणे कार्यवाही सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हापरिषदेत केंद्र सरकारकडून चौदाव्या वित्त आयोगाचा निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(४३) ५२०७६ (०४-०३-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारकडून चौदाव्या वित्त आयोगाचा निधी थेट ग्रामपचांयतींना देण्याचा निर्णय झाला असला तरी या निधीचे वाटप कसे करायचे याबाबत शासनाकडून स्पष्ट निर्देशच देण्यात आले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सातारा जिल्हा परिषदेत सदर ३१ कोटी ५९ लाख रुपयांचा निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी खर्च कसा करावा यासाठी जिल्हा परिषदांना मार्गदर्शन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत जनरल बेसिक ग्रँटच्या निधी वितरणाचे निकष ग्राम विकास विभागाच्या क्र.चौविआ-२०१५/प्र.क्र.२६/वित्त-४, दि.१६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहेत.

(२) व (३) दि.१६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरित करताना, सदर निधीच्या विनियोगासंबंधी कार्यपध्दती विशद करणारा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याने असा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये, अशा सूचना प्रस्तुत शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या.

चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दि.८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये प्राप्त झाल्या आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, चौदाव्या वित्त आयोगाच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी घ्यावयाची विकास कामे, त्याचे नियोजन व कामे घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती या संदर्भातील मार्गदर्शक सूचना ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दि.२१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार निधी खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींकडून खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अर्जुनी मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील झरी उपसा सिंचन प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ५२४६२ (०६-०५-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी उपसा सिंचन प्रकल्प (ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया) भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर, साकोली व गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगांव तालुक्यातील १८ गावांना लाभान्वित करणार असून सन २००५ साली मान्यता प्राप्त झालेले हे प्रकल्प अजूनही पुर्णत्वास येण्याच्या प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कित्येक वर्षापासून फक्त कागदोपत्री कार्यवाही सुरु असून फक्त व्ही.टी. पंप ऐवजी सबमर्सिबल पंप बसविण्याचा निर्णय घेण्यासाठी सहा महिन्यापासून अधिक्षक अभियंता (उसिंयो), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासंबंधी सध्या कोणती कार्यवाही सुरु आहे व या प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यास मंजूरीसाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) नाही, सदर योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास अद्याप मान्यता प्राप्त नाही.

झरी उपसा सिंचन प्रकल्पाचे मुळ नियोजनानुसार १८(२५१५ हेक्टर) गावाचे क्षेत्र लाभान्वित होणार होते. तथापि सुधारित नियोजनानुसार या योजनेमुळे ११(२२७५ हेक्टर) गावाचे क्षेत्र लाभान्वित होणार आहे.

(२) हे खरे नाही.

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत स्थायी समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार व्हि टी पंप ऐवजी सबमर्सीबल पंपाचे बसविण्याच्या कार्यवाहीस दिनांक २७/१/२०१६ रोजी अधिक्षक अभियंता, उपसा सिंचन योजना, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या उपसमितीच्या बैठकीमध्ये मान्यता झाली आहे.

(३) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत परिगणकाच्या अंतिम मान्यतेकरिता स्थायी समितीची बैठक लवकरच प्रस्तावित आहे.

परिगणकाच्या अंतिम मान्यतेनंतर सर्वसाधारण आराखडा तयार करण्यात येईल. सर्वसाधारण आराखडा मंजुरीनंतर प्रकल्प अहवाल सुधारित करुन राज्य तांत्रिक सल्लागार समितीस फेर सादर होईल. राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणीनंतर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेकरिता शासनास सादर करण्यात येईल.

---

**मौजे बेलगांव शिवारात कालवा खचल्यामुळे शेतात पाणी**
**घुसून पिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(४५) ५२४९८ (३०-०४-२०१६). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातून जाणाऱ्या जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून माजलगांव प्रकल्पासाठी १.५ टिएमसी पाणी सोडण्यात आले असताना मौजे बेलगांव शिवारात कालव्यास दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास खचल्यामुळे ०.०५ एम.एम.क्यू पाणी वाया जाऊन शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचा तुटवडा व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न असताना जायकवाडीच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षम कार्यप्रणालीमुळे पाण्याचे व शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामी शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होतात तसेच सदर कामाची माहिती लोकप्रतिनिधींनी मागविली असता त्याबाबत अधिकारी खरी माहिती देण्याचे टाळतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली व सदरील कालवा दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१६) :**(१) नाही,

पैठण उजवा कालवा कि.मी. ५४.९४१ या ठिकाणी पाईपिंग झाल्यामुळे कालव्यातील पाणी नजिकच्या नाल्या मध्ये उतरले व नाला अरुंद असल्यामुळे बाजुच्या शेतात पसरले. त्यामुळे शेत जमिनीचे अथवा पिकाचे नुकसान झालेले नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) शासकीय वसाहतीतील पोलीस परेड मैदान व काही बागा यांची देखभाल व दुरुस्तीअभावी दुरवस्था झाल्याबाबत**

**(४६) ५३०४१ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या कोयना जल विद्युत प्रकल्पा अंतर्गत कोळकेवाडी धरण व्यवस्थापन विभाग अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) विभागाचे अखत्यारीत असलेल्या अलोरे शासकीय वसाहतीतील पोलीस परेड मैदान व काही बागा यांची देखभाल व दुरुस्ती अभावी दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे सदर पोलीस मैदान व बागा यांवर देखभाल -दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नाही , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची मालमत्ता सुस्थितीत राखणे व प्रकल्पग्रस्तांसाठी वापरात ठेवणेच्या दृष्टीने स्थानिक ग्रामपंचायत अलोरे (ता.चिपळूण) यांनी प्रकल्पाकडे सदर मैदान व बागा ग्रामपंचायतीच्या ताब्यात देणेकरीता मागणी केली असून प्रकल्पास भविष्यात गरज लागल्यास ते परत देण्याचीही तयारी दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) जलसंपदा विभागाकडील अलोरे शासकीय वसाहती मधील पोलीस मैदान, व्यायामशाळा, बगीचे अंतर्गत रस्ते इत्यादी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्याची मागणी, सरपंच, ग्रामपंचायत, अलोरे यांनी दिनांक ०७-१०-२०१५ च्या पत्रान्वये केली होती. कोयना प्रकल्पांच्या अलोरे वसाहतीमधील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबीयांना सुविधा पुरविण्यासाठी खेळाचे मैदान, बागा यांची प्रकल्पांच्या संपादीत क्षेत्रात प्रकल्पाच्या खर्चातून व्यवस्था करण्यात आलेली आहे. ही सुविधा केवळ प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी यांचे करिताच आहे. त्यानुसार खेळाचे मैदान, बाग यांचा वापर शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचेकडून केला जात आहे. जोपर्यंत प्रकल्प आस्थापना अलोरे येथे कार्यरत आहे तोपर्यंत सदर सुविधांची आवश्यकता राहणार आहे. सद्य:स्थितीत सुविधां बाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची कोणतीही तक्रार नाही. ही जागा ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्याचा कोणताही विचार नाही. याबाबत सरपंच, ग्रामपंचायत, अलोरे यांना क्षेत्रिय स्तरावर कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील राजिवली धरण भागातील घाडगेवाडी ते येडगेवाडी आणि गायकवाडवाडी याठिकाणी रस्ता करण्याबाबत**

**(४७) ५३०५१ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील राजिवली धरण भागातील घाडगेवाडी ते येडगेवाडी आणि गायकवाडवाडी या ठिकाणी रस्ता नसल्यामुळे स्थानिक नागरीक, विद्यार्थी यांना सुमारे सहा कि.मी. डोंगरातून पायपीट करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी रस्ता होणेबाबत पाटबंधारे विभागाकडे स्थानिक ग्रामस्थ / प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी रस्ता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

घाडगेवाडी ते येडगेवाडी आणि गायकवाडवाडी या ठिकाणी वाहतूकीसाठी सद्य:स्थितीत कच्चा रस्ता (WBM Road) अस्तीत्वात आहे. तथापि येडगेवाडी ते गायकवाडवाडी पर्यंत कोणत्याही प्रकारची वाहतूक व्यवस्था नाही.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत या ठिकाणांच्या वाहतूकीसाठी WBM रस्ता असून या ठिकाणी इतर वाहनांची व एस.टी. बस वाहतूक येडगेवाडीपर्यन्त नियमीत सुरु आहे.

या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. डांबरीकरणाचे कामाबाबत अधीक्षक अभियंता, रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांचे परिपत्रक क्र.२३ दि.३/५/२००२ व परिपत्रक क्र. ३४ दि.१/७/२००२ अन्वये १५ मे नंतर डाबंरीकरणाची काम करण्यात येवू नये असे निर्देश असल्याने सदर रस्त्यांची कामे पावसाळ्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील लाला नाला प्रकल्प व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(४८) ५३०६७ (२५-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील लाला नाला प्रकल्प व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी लहान कालवा काढून सुलतानपुर-उमरी येथील शेतकऱ्यांना देण्याच्या अनुषंगाने मा.जलसंपदा मंत्री यांनी पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :**(१) तथापि लाल नाला व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी समुद्रपूर तालुक्यातील गावांना देणेबाबतचे मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले आहे, त्यात उमरी गावचा समावेश आहे.
(२) सुलतानपूर गाव हे निम्नवेणा प्रकल्पाच्या लाभाक्षेत्रात असून निवदेनातील उमरी गाव लालनाला प्रकल्पाचे वरील बाजुस असल्याने पोथरा, किंवा लाल नाला प्रकल्पाचे पाणी कालवा काढून सदर गावाला देणे शक्य नाही, तथापि, जलसंधारण विभागातर्फे या गावांना सिंचन सुविधा देणेबाबतचा अभ्यास करण्यास सुचविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना जलविद्युत प्रकल्प (जि.रत्नागिरी) स्तर ३ व स्तर ४ च्या प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ५३१२१ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना जलविद्युत प्रकल्प (जि.रत्नागिरी) स्तर ३ व स्तर ४ च्या विद्युतगृह, स्वीचयार्ड साठी जमिन संपादित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे वारंवार निवेदन देऊन त्यांच्या न्याय मागण्या मान्य करणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उत्तम गॅल्वा कंपनीस वणा नदीचे पाणी देण्याची परवानगी देताना जलसंपदा कायदे व शासन निर्णय डावलल्याबाबत**

**(५०) ५३१७१ (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) वेणा नदीचे पाणी उत्तम गॅल्वा कंपनीस वापरण्यासाठी देण्यास मा. लोकप्रतिनिधी यांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तम गॅल्वाला पाणी देण्याची परवानगी देताना जलसंपदा कायद्याच्या व शासन निर्णयाचा भंग करुन ४५ किलोमिटरच्या वणा नदीच्या वाहत्या प्रवाहातून पाणी घेण्याची परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मा.जलसंपदा मंत्री यांनी उत्तम गॅल्वा कंपनीस वेणा नदीच्या पाणी वितरण परवानगीच्या चौकशीचे आदेश दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर कंपनीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :**(१) सदर कंपनीस वेणा नदीतुन पाणी उपलब्ध करुन देण्याच्या मागणी संदर्भात मंजुरीबाबतची कार्यवाही सन २००९ पासुन सुरु असुन तेव्हापासुन जुन, २०१५ अखेरपर्यंत कोणाचाही विरोध झाला नव्हता. तथापि, जुलै, २०१५ दरम्यान श्री.संतोष तिमांडे, अध्यक्ष लोकजनशक्ती पार्टी, हिंगणघाट यांच्या निवेदनाद्वारे तसेच तदनंतर अधिवेशनात नियम ९३ अन्वये लक्षवेधी सुचना व तारांकीत प्रश्नाच्या माध्यमातुन मा.लोकप्रतिनिधी यांनी या विषया बाबत विरोध दर्शविला आहे.

(२) नाही.

शासन पत्र क्र. पाउप्र-२००९/१४०२/(४७१/२००९)/जसंअ, दि.२६.०२.२०१० अन्वये उत्तम गॅलव्हा कंपनीस वेणा नदीतून ८.७६ दलघमी पाणी औद्योगीक वापरासाठी मान्यता कळविण्यात आली आहे व त्या अनुषंगाने कंपनीसोबत करारनामा झाला आहे. यात पाणी देण्याची परवानगी देताना जलसंपदा विभागाकडील प्रचलित कायद्याचा व शासन निर्णयाचा भंग झालेला नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे** |
| **नागपूर.** | **प्रधान सचिव,** |
| | **महाराष्ट्र विधानसभा.** |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.